International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.12 No.1 September – October 2024

# पंडित नेहरू ते नरेंद्र मोदी: परराष्ट्र धोरणाचे सिंहावलोकन

**प्रा. टी. वाय. रणदिवे**

*राज्यशास्त्र विभाग,*

*अण्णासाहेब आवटे आर्ट्स, कॉमर्स व हुतात्मा बाबू गेनू सायन्स कॉलेज, मंचर*

*Corresponding Author - प्रा. टी. वाय. रणदिवे*

DOI - 10.5281/zenodo.17173750

**प्रस्तावना:**

स्वतंत्र भारताच्या अमृतमहोत्सवाचा विचार करताना, गेल्या ७५ वर्षांत देशाचे परराष्ट्र धोरण व जागतिक व्यवस्थेत भारताचे स्थान व होत गेलेल्या बदलांचा विचार करावा लागतो. जागतिक स्तरांवर विविध देशांशी सुधारलेले (सहकार्य) संबंध तथा संघर्ष (तणाव) हा आजवर भारताच्या परराष्ट्र धोरणाचा प्रवास राहिलेला आहे.तसेच जागतिक महामारीचा प्रभाव तितकाच महत्वाचा आहे. भारताच्या परराष्ट्र धोरणाचा पाया पंडित जवाहरलाल नेहरु यांनी रचला. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर खऱ्या अर्थाने भारताच्या परराष्ट्र धोरणाला आकार देण्याचा व जागतिक रंगमंचावर आढळ स्थान निर्माण करण्याचा यशस्वी प्रयत्न नेहरूंच्या नेतृत्वान सिद्ध केला. काळाच्या ओघात भारताचा परराष्ट्र धोरणाचा विकसित स्वरूप आजवर घेतलेल्या भूमिका यावरून दृष्टीस पडतो. प्रस्तुत संशोधन लेखामध्ये पंडित नेहरू ते नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात जागतिक व्यासपीठावर भारताचे परराष्ट्र धोरण कसे राहिले आहे. याचा सिंहावलोकन घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**स्वतंत्र भारताचे परराष्ट्र धोरण:**

स्वतंत्र भारताच्या परराष्ट्रविषयक धोरणाचा पाया पहिले पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांनी रचला. नेहरूंनी समाजवादी अर्थव्यवस्थेच्या माध्यमातून देशाला दिशा देण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला. पहिल्या पंधरा वर्षांत भारताने पूर्व व पश्चिमेकडील दोन्ही सत्तांशी सलोख्याचे संबंध राखले. दोघांकडून आर्थिक सहाय्यही मिळविले. पं. नेहरूंनी तब्बल १६ वर्षे परराष्ट्र मंत्रालय सांभाळले. याच काळात त्यांनी ४० देशांमध्ये दूतावास स्थापन करून, भारताची जागतिक राजकारणातील प्रतिमा निर्माण केली. आंतरराष्ट्रीय राजकारणात नेहरू, इजिप्तचे अध्यक्ष नासेर आणि युगोस्लाव्हियाचे अध्यक्ष मार्शल टिटो या त्रिमूर्तीने 'अलिप्त राष्ट्र' संघटनेची मुहूर्तमेढ रोवली. तो काळ देश नेहरूंच्या अलिप्ततावादी कल्पनांनी भारलेला होता. भारताच्या परदेशविषयक धोरणाला नेहरूंच्या कट्टर विचारधारेची धार होती. सुरुवातीला भारताची आर्थिक प्रगती संथ गतीने होऊ लागली. उलट चीन आणि जपानसारखी राष्ट्रे

प्रगतीशील मार्गाने वाटचाल करीत होती. जागतिक व्यासपीठावर भारत जरी अलिप्ततावादाचा पुरस्कार करीत होता, तरी राजकीय आघाडीवर सोव्हियत रशियाशी अधिक जवळीक दिसत होती. सन १९७७ ते १९८० या काळात काँग्रेस व्यतिरिक्त इतर पक्षांच्या आघाडीने दिल्लीवर राज्य केले. हा एक अपवाद वगळला, तर या सर्व धोरणावर भारतातील जुन्या व मोठ्या पक्षाचे वर्चस्व असल्याचे आढळते.

**गांधी घराणा व भारताचे परराष्ट्रीय धोरण:**

नेहरूनंतर हा पक्ष इंदिरा गांधी आणि नंतर राजीव गांधी यांच्या प्रभावाखाली आला. सहाजिकच भारताच्या परराष्ट्र धोरणावर नेहरू-गांधी घराण्याचाच प्रभाव राहिला आहे. नेहरूनी एक बळकट आणि उच्चतम अर्थव्यवस्था देशाच्या हाती देण्याचा प्रयत्न केला. इंदिरा गांधींनी त्या अर्थव्यवस्थेला लोकप्रियतेची जोड दिली. सन १९७१च्या निवडणुकीत इंदिरा गांधींना जनतेने भरघोस पाठिंबा दिला; त्यामुळे सर्व सत्ता गांधी यांच्या हाती एकवटली. १९७१ मध्ये बांगलादेश स्वतंत्र करण्यासाठी भारताने जी तडफ दाखविली; त्यामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणातील दबदबाही वाढला. या कारवाईमुळे भारताचे सोव्हियत रशियाशी असलेले संबंध अधिक दृढ झाले. साहजिकच या युद्धावेळी व नंतरही अमेरिकेचा कल पाकिस्तानकडे राहिला. भारताची रशियाशी जवळीक वाढल्याने, साहजिकच अमेरिकाही अधिकाधिक पाकिस्तान धार्जिणी झाली. १९७४ मधील पहिल्या अणुचाचणीनंतर अमेरिकेने भारतावर काही बाबतींत बहिष्कार टाकला. या दोन्ही घटनांमुळे भारताचे अमेरिकेशी शत्रुत्व वाढत चालले आहे, असा समज दृढ होत गेला. या काळात अमेरिकी अध्यक्ष निक्सन यांची इंदिरा गांधींवर नाराजी होती. विशेषतः सत्तरच्या दशकाच्या अखेरीस, भारत अलिप्ततावादापासून दूर सरकला आणि वसाहतवादी पश्चिमी राष्ट्रांपेक्षा साम्यवादी रशिया आपल्याला जवळचा वाटू लागला. १९८०मध्ये पुन्हा सत्ता मिळाल्यानंतर इंदिरा गांधी आणि त्यांच्या पश्चात राजीव गांधींनी विचारपूर्वक अमेरिका आणि पश्चिमी जगाशी असलेल्या संबंधांची नव्याने बांधणी करण्याचा प्रयत्न केला; त्याचबरोबर चीन व पाकिस्तान यांच्याशी असलेले संबंधही सामान्य स्तरावर आणण्याचा प्रयत्न केला. याचवेळी देशांतर्गत राजकीय पातळीवर असंख्य आव्हानांना तोंड देण्याचा प्रसंग आला. पंजाब, जम्मू-काश्मीर आणि वायव्य सीमा येथे अशांतता वाढत चालली होती. आखाती देशांमध्येही अनेक प्रकारे अशांतता होती. अरब- इस्राईल संघर्ष पेटलेला होता आणि दुसरीकडे इराण-इराक युद्ध अनेक वर्षे चालले; त्यामुळे तेलाचे भाव वाढतच गेले.

**डिजिटल युग व भारताचे परराष्ट्र धोरण:**

१९९०च्या दशकात डिजिटल युग अवतरले. भारताची अर्थव्यवस्था जसजशी विकसित होऊ लागली, तसा परराष्ट्र धोरणामध्ये बदल होऊ लागला. अलिप्ततावादी धोरण बाजूला ठेवले गेले. पी. व्ही. नरसिंह राव यांच्या काळात

परराष्ट्र धोरण नव्याने आखण्यात आले. भारताचा अणू विषयक कार्यक्रम बाजूला ठेवण्यासाठी अमेरिकेकडून सतत दबाव येत होता. त्याला पी. व्ही. नरसिंह राव यांनी जुमानले नाही. १९९६ ते १९९८ या काळात पंतप्रधान इंद्रकुमार गुजराल यांनी शेजारी राष्ट्रांशी; विशेषतः पाकिस्तानशी सलोखा राखण्यावर भर दिला. नंतरचे पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी आणि डॉ. मनमोहनसिंग यांनी याच धोरणाचा पाठपुरावा केला. 'सार्क' देशांकडे भारताने अधिक लक्ष दिले आणि दक्षिण आशियाई राष्ट्रांशी आर्थिक व सुरक्षा संबंध मजबूत केले. सन १९९८मध्ये अटल बिहारी वाजपेयी यांनी पाच अणुचाचण्या घेतल्या आणि भारत एक आण्विक सत्ता असल्याचे जाहीर केले. यामुळे तत्कालीन अमेरिकी अध्यक्ष बिल क्लिंटन यांची नाराजी ओढावून घेतलीच; शिवाय निर्बंधदेखील. तरीही वाजपेयी यांनी भारत व अमेरिका संबंधात विशेष प्रगती केली आणि हे दोन देश नैसर्गिक मित्र असल्याचे संबोधले. त्यांच्या काळात अमेरिकेशी आण्विक करार करण्याबाबत धोरण आखले जात होते. १९९९ च्या कारगिल युद्धानंतर, पाकिस्तानशी संबंध अधिकच चिघळत गेले. डॉ. मनमोहनसिंग यांनी चीन, पाकिस्तान व बांगलादेश या देशांसाठी धोरण जाहीर केले होते; परंतु त्याची फलनिष्पत्ती झाली नाही. 'यूपीए' सरकारच्या काळात आर्थिक विकासाची गती थोडी मंदावली. अंतर्गत सुधारणेसाठी अनेक पर्याय उपलब्ध होते. २००५ ते २००७ या काळात पाकिस्तानचे प्रमुख परवेज मुशर्रफ यांच्याशी संवाद साधताना, डॉ. सिंग काश्मीरप्रश्नी निर्णायक स्वरूपात आले होते. याच काळात चीनविषयीचे धोरणही काही प्रमाणात सुधारत होते. २००९मध्ये पुन्हा सत्ता प्राप्त केल्यानंतर, अमेरिकेशी असलेले संबंध दृढ करण्याचा प्रयत्न काँग्रेस सरकारकडून झाला नाही. अमेरिकेशी भागीदारी करण्याचे त्यांचे विचार सीमित राहिले. या काळात परराष्ट्र नीतीवर फार प्रभाव पाडता आला नाही, हे वास्तव आहे. पाकिस्तान पुरस्कृत दहशतवाद ही नव्वदच्या दशकात मोठी समस्या बनली होती.

**मा.नरेंद्र मोदी- व भारताचे परराष्ट्रीय धोरण:**

भारतीय जनता पक्ष मध्ये सत्तेत आल्यानंतर, अल्पावधीतच पंतप्रधान नरेंद्र मोदींनी जागतिक नेत्यांशी उत्तम संबंध प्रस्थापित केले. पहिल्या दहा महिन्यांतच भारताच्या राजनैतिक संबंधांना अतिशय वेग आला. मोदींनी सुमारे ६२ देशांचा दौरा केला आणि अनेक राष्ट्रप्रमुख, नेते, उद्योगपतींच्या भेटी घेतल्या. विविध राष्ट्रांचा दौरा करताना, मोदी तेथील उद्योजक व मूळ भारतीय वर्गाशी आवर्जून संवाद साधताना दिसले. या संवादात ते वेळोवेळी 'मेक इन इंडिया'चा आवर्जून उल्लेख करत; जेणेकरून भारतात गुंतवणूक वाढेल आणि अर्थव्यवस्थेला बळकटी मिळेल. इस्राईलला भेट देणारे ते पहिले भारतीय पंतप्रधान ठरले. अमेरिकेचा विरोध असतानादेखील, इस्राईलशी युद्ध साहित्याबाबत करार करतात, तर अमेरिकेसारख्या महासत्तेच्या जवळ जाताना भारताची नवीन ओळख करून देत, आपले महत्त्व पटवताना दिसतात.

न्यूयॉर्कमध्ये 'हाऊ डी मोदी' कार्यक्रमाच्या माध्यमातून वेगळा प्रभाव दाखवण्याचा प्रयत्न करतात. मोदींनी ब्रिक्स (ब्राझील, रशिया, चीन, भारत आणि द. आफ्रिका) यांच्याशी अधिक चांगले संबंध निर्माण केले आणि युरोपातील जी-२० या बलाढ्य प्रगतीशील देशांशी उत्तम जवळीक निर्माण केली.

आशियातील इतर देशांबरोबर संबंध सुधारत असताना, त्यांनी इतिहासाची उजळणीही केली. भावनेला हात घालून सांस्कृतिक संबंध प्रस्थापित केले. 'ॲक्ट ईस्ट' धोरण नव्याने पुढे आणत आर्थिक बळकटीसाठी महत्त्वाचे पाऊल उचलले. मोदींनी आपल्या कार्यकाळात 'आसियान'च्या सर्व शिखर परिषदांना हजेरी लावलेली दिसते. संयुक्त राष्ट्रसंघाच्या सुरक्षा परिषदेचे कायमचे सदस्यत्व मिळावे, म्हणून अनेक राष्ट्रांना त्यांनी आपलेसे करण्याचा प्रयत्न केला. या काळात पाकिस्तानबाबतच्या धोरणात आमूलाग्र बदल झालेला दिसून येतो. अमेरिकेची भूमिकाही बदलताना दिसते. अमेरिकेचे माजी अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पाकिस्तानला कडक भाषेत सुनावले होते; तसेच त्यांची आर्थिक मदत बंद केली होती. आता पाकिस्तानला अमेरिकेच्या मित्रराष्ट्र यादीत स्थान नाही, हा भारतीय परराष्ट्र कूटनीतीचा मोठाच विजय मानायला हवा. मोदी यांच्या काळात शेजारील राष्ट्रांशी संबंध सुधारण्याचे प्रयत्न मोठ्या प्रमाणावर झाले. नेपाळ, बांगलादेश, भूतान, श्रीलंका या देशांचे दौरे करून, मोदींनी शेजारी राष्ट्रांशी संबंध सुधारण्यावर भर दिलेला दिसतो. यामुळे भारतीय खंडातील चीनच्या हस्तक्षेपास काही प्रमाणात चाप लागलेला दिसतो.

भारतामध्ये स्थिर सरकार आल्यानंतर परराष्ट्र धोरणात सातत्य येते. साहजिकच परराष्ट्रीय संबंधात विश्वास निर्माण होतो. नव्वदच्या दशकानंतर राष्ट्रहिताला प्रथम प्राधान्य देणारे; तसेच वास्तववादी विदेशनीतीचे धोरण स्वीकारणारे सरकार सत्तेवर असल्याने, किमान या क्षेत्रात तरी भारताने वेगळीच उंची निर्माण केलेली दिसते.

**कोविड -19 व भारताचे परराष्ट्र धोरण:**

**वैद्यकीय राजनय:**

ऐतिहासिकदृष्ट्या, भारताला नेहमीच गरीबीने ग्रस्त म्हणून चित्रित केले गेले आहे. अगदी वसाहतवाद्यांनीही कायमस्वरूपी रोगराई अशी प्रतिमा रंगवली. अनेक वर्षांपासून, जगाने देशाला प्रदाता म्हणून न पाहता जागतिक आरोग्य लाभ मिळवणाऱ्या निव्वळ प्राप्तकर्ता म्हणून पाहिले. तथापि, या साथीच्या रोगाने आंतरराष्ट्रीय आरोग्य प्रदाते म्हणून भारताची भूमिका बदलली आहे आणि वैद्यकीय मुत्सद्देगिरी वाढवली आहे. हायड्रॉक्सीक्लोरोक्वीन औषधांपासून, आता कोविड -१९ लस पाठवण्यापर्यंत, भारत गरजू प्रत्येकापर्यंत पोहोचत आहे. भारताने "लसी मैत्री" नावाची एक चळवळ देखील सुरू केली आहे, 11 मे 2021 पर्यंत भारताने परदेशात 663.698 लाख लस डोस निर्यात केले. त्याच वेळी, भारतात सुमारे तीनपट लसीचे डोस दिले गेले आहेत. निर्यातीपैकी केवळ 107.15 लाख लसीचे डोस मदत म्हणून

पाठवण्यात आले आहेत. म्हणजेच एकूण निर्यातीच्या फक्त 16 टक्के. उर्वरित 84 टक्के लस पुरवठा दोन वर्गात मोडतो. एकूण निर्यातीपैकी सुमारे 54 टक्के - 357.92 लाख लस डोस - दोन लस उत्पादक (सीरम इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया आणि भारत बायोटेक) द्वारे व्यावसायिक पुरवठा म्हणून पाठवले गेले आहेत. याशिवाय, सीरम इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाद्वारे 198.628 लाख लसीचे डोस (एकूण पुरवठ्यापैकी 30 टक्के) WHO च्या COVAX सुविधेसाठी पाठवले गेले आहेत. या दोन्ही श्रेण्या लस उत्पादकांची करारबद्ध जबाबदारी पूर्ण करतात. भारताचे हे क्रांतिकारी पाऊल दीर्घकालीन आपली सामरिक, आर्थिक आणि आंतरराष्ट्रीय प्रतिमा मजबूत करण्यात मदत करेल.

**नेबरहुड फर्स्ट पॉलिसी:**

माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयींनी एकदा प्रसिद्धपणे म्हटले होते "तुम्ही तुमचे मित्र बदलू शकता पण शेजारी नाही". हे धोरण भारताच्या निकटवर्तीयांशी संबंध सुधारण्यावर सक्रियपणे केंद्रित आहे. 2014 पासून हा परिसर भारताच्या परराष्ट्र आणि सुरक्षा धोरणांचा एक प्राथमिक मुत्सद्दी क्षेत्र आणि केंद्रीय आधारस्तंभ आहे. लस मैत्री, कठीण काळात मानवजातीच्या अधिक चांगल्यासाठी भारताची लस उत्पादन क्षमता उपलब्ध करून देण्याचा जटिल आणि दूरगामी प्रयत्न, शेजारी आहे कृतीत प्रथम. भारताने 16 जानेवारी 2021 रोजी आपली राष्ट्रीय लस आणली आणि 4 दिवसांच्या आत म्हणजे 20 जानेवारी रोजी भारतीय लसींची पहिली किस्त भूतान आणि मालदीवमध्ये दाखल झाली. 21 जानेवारी रोजी बांगलादेश आणि नेपाळमध्ये. आणि 22 जानेवारी रोजी म्यानमार आणि सेशेल्स मध्ये. सहाय्य म्हणून पाठवलेल्या लस भारताच्या स्वतःच्या अतिपरिचित क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणावर पाठवण्यात आल्या आहेत. 107.15 लाख डोसपैकी 78.5 लाख डोस (73.26 टक्के) फक्त सात शेजारी देशांना पाठवले गेले आहेत. ही केवळ चांगली मुत्सद्देगिरीच नाही तर ती चांगली महामारीशास्त्र देखील आहे. भारतातील तात्काळ शेजाऱ्यांना लसीकरण करणे हा देशातील साथीच्या आजारावर नियंत्रण ठेवण्याचा एक आवश्यक भाग आहे. तथापि, कोविड -१९ नंतर दक्षिण आशियाई क्षेत्रातील चीनच्या वाढत्या प्रभावामुळे, भारताच्या शेजारच्या प्रधानतेमध्ये हळूहळू घट होऊ शकते आणि केवळ त्याचे ऐतिहासिक संबंध भारताचे प्रादेशिक वर्चस्व राखू शकत नाहीत.

**इंडो-पॅसिफिक क्षेत्रात प्राधान्य:**

चतुर्भुज सुरक्षा संवाद (चतुर्भुज) भारत, अमेरिका, जपान आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील अनौपचारिक धोरणात्मक संवाद आहे ज्याचा उद्देश भारताने मुक्त-खुल्या आणि समृद्ध भारत-पॅसिफिक क्षेत्राला पाठिंबा देण्यासाठी दिला आहे, ज्याला चीन धमकावू इच्छित आहे. क्वाडसह गुंतणे भारताची दोन भौगोलिक-धोरणात्मक उद्दिष्टे पूर्ण करू शकते उदा. सीमेवर चीनच्या आक्रमक पवित्राचा सामना भारताच्या सागरी क्षेत्रात दृढनिश्चय आणि या क्षेत्रातील निव्वळ सुरक्षा प्रदाता म्हणून उदयास येत आहे. तथापि, या साथीचा भारताच्या क्षमतेवर

आणि इंडो-पॅसिफिक आणि क्वाडमध्ये योगदान देण्याच्या इच्छेवर परिणाम होऊ शकतो. साथीच्या रोगाने आणलेली आर्थिक मंदी कोणत्याही महत्वाकांक्षी लष्करी खर्च किंवा आधुनिकीकरणाच्या योजनांना रोखू शकते. कमी लष्करी खर्च आणि प्रादेशिक भौगोलिक राजकारणाकडे कमी राजनैतिक लक्ष यामुळे, भारताची शक्ती प्रक्षेपित करण्याची क्षमता आणि चतुर्भुजच्या वाढीमध्ये योगदान देण्याचा सट्टा असेल.

**भारत-अमेरिका संबंध:**

कोविड महामारीची आव्हाने आणि अमेरिकन प्रशासनात बदल यामुळे दोन शक्तिशाली लोकशाहीमधील सतत विकसित होणाऱ्या नातेसंबंधात गतिशीलता वाढली आहे. गेल्या वर्षी महत्त्वाच्या संरक्षण करारावर स्वाक्षरी करणे, क्वाड अलायन्सला औपचारिक बनवण्याच्या दिशेने काम करणे किंवा चीनबरोबरच्या एलएसी स्टँडऑफ दरम्यान भारताला सक्रियपणे समर्थन देणे. नोव्हेंबर 2020 मध्ये झालेला मलबार अभ्यास हा भारत-अमेरिका सामरिक संबंधांचा एक उच्च बिंदू होता. चीनला एक मजबूत संदेश पाठवत चारही क्वाड देशांच्या नौदलांमध्ये 13 वर्षांत प्रथमच मेगा नेव्हल ड्रिल आयोजित करण्यात आली. तथापि, भारत - अमेरिका संबंधांमध्येही साथीच्या काळात काही चढउतार दिसून आले. जेव्हा अमेरिका प्राणघातक कोविड लाटेला सामोरे जात होते, तेव्हा भारताने वैद्यकीय पुरवठा निर्यात करून आणि निर्यात निर्बंध शिथिल करून मदत केली. तथापि, या वर्षाच्या सुरुवातीला भारत त्याच टप्प्यातून जात असताना अमेरिका परस्पर प्रतिसाद देण्यास संकोच करत होती. बिडेन प्रशासनाच्या "अमेरिका फर्स्ट" धोरणाने जगभर व्यापक निषेध व्यक्त केला ज्यामुळे अमेरिकेने त्वरीत ट्रॅक बदलला आणि नंतर पुरवठा वाढवला. अशा वेळी जेव्हा साथीचा रोग अजूनही गर्जना करत आहे आणि लसी वाढत्या अत्यावश्यक होत आहेत, जागतिक पातळीवर साथीच्या रोगाला रोखण्यासाठी भारत-अमेरिका संबंध मजबूत होतील.

**भारत-चीन संबंध:**

2020 मध्ये भारत आणि चीनची सकारात्मक सुरुवात झाली असली तरी साथीच्या रोगाच्या उद्रेकामुळे गोष्टी वेगाने वाढल्या. वर्षभरापासून, त्यांचे नातेसंबंध जनुस-चेहरे आहेत. जरी दोन्ही देशांमध्ये मानवीय सहाय्याची महत्त्वपूर्ण पातळी असली तरी सीमेवरील तणाव भडकला आहे. लष्करी आणि मुत्सद्दी वाटाघाटींच्या मालिकेमुळे गेल्या वर्षी मे महिन्याच्या सुरुवातीपासून भारत आणि चीन यांच्यात लष्करी अडथळे निर्माण झाल्यानंतर फेब्रुवारीमध्ये पॅनगॉन्ग लेकच्या उत्तर आणि दक्षिण किनाऱ्यांवरून सैन्य आणि शस्त्रे पूर्णपणे काढून घेण्यात आली. उर्वरित घर्षण बिंदूंवर तोडगा काढण्यासाठी आता दोन्ही बाजूंमधून विलग होण्याची चर्चा सुरू आहे. भारत सरकारने चिनी उत्पादने आणि चिनी ॲप्सवर विशेषतः गलवान संघर्षानंतर बंदी घातली. सध्या, भारत आणि चीनचे संबंध नाजूक आहेत आणि त्याला संरक्षणवादी धोरणे आणि पूर्ण सहकार्य

यापैकी एक निवडावे लागेल. भारत आणि चीन हे शत्रू असतील की मित्र असतील हे अजून पाहायचे आहे.

**आव्हाने:**

१. सागरी सुरक्षा
२. दहशतवाद
३. चीनचा वाढता हस्तक्षेप
४. दक्षिण आशियाई राष्ट्र व भारत यामधील पारस्पारिक अविश्वास
५. आर्थिक-व्यापारी आणि संरक्षणविषयक हितसंबंध

**निष्कर्ष:**

स्वतंत्र भारताच्या अमृतमहोत्सवाचा विचार करताना, गेल्या ७५ वर्षांत देशाचे परराष्ट्र धोरण व मुत्सद्देगिरी अनुकूल आणि विकसित होताना दिसते. दुसऱ्या महायुद्धानंतर आणि महामंदीनंतर आर्थिक तेजी आली आणि दुसऱ्या महायुद्धानंतरच्या चारही प्रमुख मंदीनंतर असाच कल दिसून आला. आरोग्य संकटांमुळे औषध आणि सार्वजनिक आरोग्यामध्ये लक्षणीय गुंतवणूक झाली आहे. महामारीनंतरही हेच अपेक्षित आहे आणि भारताने त्याच्या राखेतून उठले पाहिजे. येत्या काही वर्षांमध्ये, भारताकडे एक सक्रिय आणि गतिशील जागतिक धोरण असावे. भारताने जुन्या भागीदार आणि सहयोगींसोबत सहकार्य वाढवले पाहिजे आणि त्याचबरोबर वाढत्या शक्तींसह नवीन भागीदारी तयार केली पाहिजे. या नव्या जागतिक संरचनेत भारताला अधिक व्यापक भूमिका वठवण्याची संधी आहे. त्यासाठी भारताने आदर्शवादी संकल्पनांच्या जोखडातून बाहेर पडून वास्तवाची कास धरायला हवी.

**संदर्भग्रंथ:**

१. Sikri Rajiv, (2009) Challenge and Strategy: Rethinking India’s Foreign Policy, Sage Publication, New Delhi.
२. Ganguly Sumit, (2011) India’s Foreign Policy: Retrospect and Prospect,
३. C. Raja Mohan, (2015) Modi’s World, Expanding India’s Sphere of Influence, Harper Collins Publisher, India.
४. Ogden Chris, (2014) Indian Foreign Policy, Polity Press Cambridge, U.K.
५. Pant Harsh, (2019) New Directions in India’s Foreign Policy Theory and Praxis, Cambridge University Press, U.K.
६. Kurup Smriti, 6 aug-2021 Impact of Covid-19 on India’s foreign policy: An analysis, The Daily Guardian.

७. पेंडसे अरुणा, सहस्त्रबुद्धे उत्तरा (२०११) शीतयुद्धोत्तर व जागतिक राजकारण, ओरिएन्त ब्लकस्वन प्रायवेट लिमिटेड, मुंबई.

८. देवळाणकर, शैलेंद्र (२००७): भारतीय परराष्ट्रीय धोरण: सातत्य व स्थित्यंतर, प्रतिमा प्रकाशन, पुणे.

९. देवळाणकर, शैलेंद्र (२०१५): भारत आणि जग, सकाळ प्रकाशन, पुणे.

१०.मोरखंडीकर, राघवेंद्र (२०१०): भारताच्या शीतयुद्धोत्तर परराष्ट्रीय धोरणाचे आंतरराष्ट्रीय संदर्भ, ( भारत आणि आंतरराष्ट्रीय भू-राजकारण ), समाज प्रबोधन पत्रिका आणि सेंटर फॉर स्टडी कल्चर अंड सोसायटी, निवडक समाज प्रबोधन पत्रिका खंड-२, लोकवांग्मय गृह, मुंबई.